# <u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५१/२०२५ – निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

श्रीमती सरस्वती शिवराम कांबळे इ. वि. कोणीही नाही.

CNR No. MHSO2000-2846-2025

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै. शिवराम चंद्रु कांबळे दि.२/४/२००६ रोजी घेरडी, ता. सांगोला येथे मयत झालेले आहेत. त्यामुळे मयत शिवराम यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. सदर वरील अर्जदार क्र.१ ते ३ व्यतिरीक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सदर अर्जदार हे एकत्र एकविचाराने राहत असून त्यांचे सर्वांचे हितसंबंध एकच आहेत.

३. अर्जदार यांची वंशावळ खालील प्रमाणे –

शिवराम (मयत)

सरस्वती (पत्नी) अर्जदार क्र.१

विजय (अर्जदार क्र.२) गजानन (अर्जदार क्र.३)

४. अर्जदारांचे पुढील कथन असे की, कै. शिवराम चंद्रु कांबळे हे दि.२/४/२००६ रोजी घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत शिवराम यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच हिंदु वारस कायद्याप्रमाणे एकमेव वारसदार आहेत. त्याव्यतिरीक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. प्रस्तुत मयत शिवराम यांचे वारसांना "वारस प्रमाणपत्र" मिळणेकामी प्रस्तुत अर्जाशिवाय अर्जदार यांनी इतर कोणत्याही कोर्टात दावा अगर अर्ज दाखल केला नाही. अर्जदार यांना शासकीय कामासाठी मयत शिवराम यांची वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे प्रस्तुतचा

अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

५. अर्ज दाखल झाल्यानंतर दि.२०/०१/२०२६ रोजीच्या "तरुण भारत" मध्ये जाहीर घोषणा देण्यात आली होती. सदर दैनिकमधील संबंधीत जाहीर घोषणा निशाणी क्र.१० दाखल आहे. त्याचप्रमाणे मौजे घेरडी, ता. सांगोला, जिल्हा सोलापूर येथे जाहीर प्रगटण दर्शनी भागावर डकविल्याबाबतचा बेलिफ यांचा अहवाल दाखल आहे. अर्जाला कोणाचाही आक्षेप आजतागायत आलेला नाही. अर्जदार नं.२ यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.११ कडे तसेच अर्जदार तर्फे साक्षीदार किरण बबन कांबळे यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.१२ कडे दाखल केले आहे.

६. अर्जदार यांनी नि.४/४ कडे शिवराम चंद्रु कांबळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता शिवराम चंद्रु कांबळे यांचा दि.२/४/२००६ रोजी मृत्यू झाल्याचे दिसून येते.

७. अर्जदारांच्या दाव्यास कोणाचाही आक्षेप न आल्याने त्यांनी नमूद केलेली नाती व त्यांचे कथन या बाबी बरोबर आहेत हे जास्त संभाव्य वाटते. त्यामुळे अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबतचा वारसा दाखला देणे न्यायोचित होईल असे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे दिसुन येते. कायद्याच्या गृहीतकांनुसार वारस प्रमााणपत्र (Herirship Certificate) मयत मृत व्यक्तिच्या मालमत्तेसंदर्भात कोणतेही हक्क संबंध ठरवत नाही. वारस प्रमाणपत्र केवळ कायदेशीर वारसांना अधिकृत करते. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत शिवराम चंद्रु कांबळे यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी आवश्यक त्या कोर्ट फी ची पूर्तता करावी.

४. अर्जदारांनी हमीपत्र दाखल करावे.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.09 13:09:43 +0530

ठिकाण – सांगोला
दिनांक – ०९/०४/२०२६

**(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 09/04/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 09/04/2026 |